# पुणे विद्यापीठ

**परिपत्रक क्र. : २४०/२०१२**

**"त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक"** दरवर्षी पदवीप्रदान समारंभामध्ये देण्यात येते. हे सुवर्णपदक एप्रिल/मे २००६ च्या परीक्षेपासून देण्यात येत असून विज्ञान विद्याशाखा आणि विज्ञानेतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यास दरवर्षी आलटून–पालटून देण्यात येते.

सन २०११–२०१२ या शैक्षणिक वर्षासाठी हे सुवर्णपदक विज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त इतर विद्याशाखेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये विशेष गुणवत्ता प्राप्त केलेल्या एका विद्यार्थीनीस हे सुवर्णपदक देण्यात येणार आहे. पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, सन २०११–१२ या शैक्षणिक वर्षामध्ये विज्ञान विद्याशाखेअंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विशेष गुणवत्ता प्राप्त एका विद्यार्थीनीची शिफारस खालील नियम व अटींच्या अधिन राहून **दिनांक २ जानेवारी, २०१३ पूर्वी** पदव्युत्तर प्रवेश विभागाकडे पाठवावी.

**''त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदकाच्या'' नियम व अटी :**

१) सुवर्णपदकाचे नांव – **त्यागमूर्ती श्रीमती सरस्वती रामचंद्र शेलार सुवर्णपदक**.
२) पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सर्व विषयांच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमातील सर्वोत्कृष्ट विद्यार्थीनीस हे सुवर्णपदक देण्यांत येईल.
३) सदर पारितोषिक प्रथमवर्षी विज्ञान विद्याशाखा व दुसऱ्या वर्षी विज्ञान विद्याशाखेव्यतिरिक्त इतर विद्याशाखेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यास देण्यात येईल.
४) इयत्ता दहावी, बारावी व पदवी परीक्षेतील गुण हे प्रथम वा द्वितीय क्रमांकाच्या पात्रतेचे असावेत.
५) विद्यार्थीनी भारतीय संस्कृती, आचार–विचार, भारतीय परंपरा मानणारी व त्याचे स्वत:च्या दैनंदिन जीवनात आचरण करणारी असावी.

६) विद्यार्थीनी सर्व भारतीय व परदेशी क्रीडा तसेच वैयक्तिक व सांघिक अशा क्रीडा स्पर्धांमध्ये जास्तीतजास्त पारितोषिके मिळविलेली असावी. यामध्ये ध्यानधारणा, प्राणायाम, योगासने करणारीस प्राधान्य दयावे.

७) गायन, नृत्य, वक्तृत्व, नाटय व इतर कलांमध्ये नैपुण्य प्राप्त केलेली असावी.

८) रक्तदान, श्रमदान, पर्यावरण रक्षण व प्रदूषण नियंत्रण कार्य, साक्षरता व स्वच्छता मोहिम तसेच एड्स रोगाविरुध्द जनजागरण मोहिम इ. मध्ये सहभाग असावा.

९) विद्यार्थीनी शाकाहारी व निर्व्यसनी असावी.

१०) पदव्युत्तर अभ्यासक्रमातील विद्यार्थीनी उपलब्ध नसल्यास पदवी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनीचा विचार करण्यात येईल.

११) सुवर्णपदकास पात्र असणाऱ्या विद्यार्थीनीला अध्यादेश क्र. १०९, ११० व १४३ ची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१२) अध्यादेश क्र. १६८ नुसार परीक्षेस बसणारी विद्यार्थीनी सुवर्णपदकास पात्र ठरणार नाही.

उपकुलसचिव,
पदव्युत्तर प्रवेश विभाग

पदव्युत्तर प्रवेश विभाग }
संदर्भ क्र. : प.प्रवेश/५४८६ }
दिनांक : १८-१२-२०१२ }